तालुकाबाहय प्रशासकीय बदली झालेल्या प्राथमिक शिक्षकांच्या आपसी बदलीबाबत मार्गदर्शक तत्त्वे

# महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग

## शासन परिपत्रक क्रमांकः जिपब ०९१३/प्र.क्र.२४६/आस्था१४

मंत्रालय, मुंबई ४०० ००१

दिनांक : २८ ऑक्टोंबर, २०१३

**शासन परिपत्रक:-**

जिल्हा परिषदेमधील वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदलीबाबत शासन निर्णय क्र.जिपब ०२१०/प्र.क्र.३१/आस्था१४, दिनांक ६ मे, २०१० व शासन निर्णय क्रमांक जिपब०८११/प्र.क्र.१२२/आस्था१४, दिनांक २० एप्रिल, २०१२ अन्वये मार्गदर्शक तत्त्वे विहीत करुन जिल्हांतर्गत बदल्यांची कार्यवाही करण्यात आली आहे. सदर कार्यवाही करताना प्रशासकीय बदलीपात्र प्राथमिक शिक्षकांना दूर अंतरावर तालुक्याबाहेर जावे लागले आहे. त्यामुळे त्यांच्यामध्ये असंतोष निर्माण होवून, त्याचा परिणाम शालेय गुणवत्तेवर होत असल्याची शक्यता विचारात घेता, अध्ययन व अध्यापन प्रक्रिया ही संपूर्णपणे शिक्षकांच्या मानसिकतेवर अवलंबून असल्यामुळे प्राथमिक शिक्षकांकडून /महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ यांचेकडून सन २०११ व सन २०१२ मध्ये तालुकाबाहय बदली झालेल्या प्राथमिक शिक्षकांना त्यांच्या मूळ तालुक्यात येण्यासाठी आप-आपसात बदली करण्याची विनंती /निवेदने प्राप्त झाली होती. त्याअनुषंगाने तालुकाबाहय बदली झालेल्या प्राथमिक शिक्षकांच्या आपसी बदली करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. त्यासंदर्भात सन २०११ व सन २०१२ मध्ये तालुकाबाहय प्रशासकीय बदली झालेल्या प्राथमिक शिक्षकांच्या आपसी बदलीबाबत पुढीलप्रमाणे सुधारीत धोरण निश्चित करण्यात येत आहे.

१) केवळ सन २०११ व सन २०१२ मध्ये तालुकाबाहय प्रशासकीय बदली झालेले प्राथमिक शिक्षकच आपसी बदलीस पात्र असतील.

२) आपसी बदलीसाठी शासन निर्णय क्र.जिपब ०२१०/प्र.क्र.३१/आस्था१४, दिनांक ६ मे, २०१० व शासन निर्णय क्रमांक जिपब०८११/प्र.क्र.१२२/आस्था१४, दिनांक २० एप्रिल, २०१२ अन्वये प्रशासकीय बदली झालेले प्राथमिक शिक्षकच असले पाहिजेत.

३) आपसी बदलीस इच्छुक असणाऱ्या दोन्ही शिक्षकांचे संमतीपत्र त्यासाठी आवश्यक राहील.

४) आपसी बदल्यांसाठी कोणतीही टक्केवारीची मर्यादा राहणार नाही.
आपसी बदल्यातील इच्छुक प्राथमिक शिक्षकांना सेवा कालावधीची अट लागू राहणार नाही.

५) आपसी बदलीसाठी इच्छुक असणाऱ्या प्राथमिक शिक्षकांनी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दिनांक ७ नोव्हेंबर, २०१३ पर्यंत अर्ज करणे आवश्यक आहे.

६) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अर्जाची छाननी करुन दिनांक ११ व १२ नोव्हेंबर २०१३ रोजी बदलीचे आदेश निर्गमित करुन संबंधितांना तात्काळ कार्यमुक्त करुन रुजू होण्याबाबत आदेशित करण्यात यावे.

७) जेणेकरुन आपसी बदलीची प्रक्रिया राबविताना अध्ययन व अध्यापन यावर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी.

८) सदर आपसी बदल्या या विनंतीनुसार बदली असल्यामुळे यासाठी कोणतेही भत्ते व पदग्रहण अवधी कर्मचाऱ्यास अनुज्ञेय राहणार नाही.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१३१०२८१५५७१९९५२० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rahate Ganpat K

Digitally signed by Rahate Ganpat K
DN: CN = Rahate Ganpat K, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = RDD
Reason: I am the author of this document
Date: 2013.10.28 18:26:00 +05'30'

**(ग.के. रहाटे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी
३. सर्व उप आयुक्त, (आस्थापना) ,विभागीय आयुक्त कार्यालय
४. मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव.
६. निवडनस्ती